## निशाणी क्र.१९ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांनी नि.१६ वरील आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाद मागणेची आहे तरी प्रतिवादी नं.२ यास एक महिना कालावधी देऊन सदर आदेश अपील करेपर्यंत स्थगित करावा अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास वादीच्या विधीज्ञांनी आपले म्हणणे देऊन विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जावर प्रतिवादी नं.१ ची सही नाही. प्रतिवादी नं.२ च्या वकीलांना असा अर्ज कायद्याने देता येणार नाही. सदरचा अर्ज केवळ वेळकाढुपणाने देऊन वादीस न्यायापासुन वंचित ठेवण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादी नं.१ हा मे. कोर्टासमोर येऊन स्वतःची बाजु मांडत नाही. तरी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता नि.१६ वरील प्रतिवादी नं.२ यांचा अर्ज दि.१९/०६/२०२३ रोजी गुणदोषावर निकाली करुन तो नामंजुर करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना सदरच्या अर्जावरील आदेश हा माननीय उच्च न्यायालयासमोर आव्हानित करणेचा आहे. प्रतिवादी यांना दि. १९/०७/२०२३ पासुन ते ११/०८/२०२३ पर्यंत असा एकुण बावीस दिवसांचा कालावधी मिळालेला आहे. परंतु अद्यापपावेतो त्यांनी सदरचा अर्ज हा मा.उच्च न्यायालयासमोर आव्हानित केलेला नाही. सदर आदेशाविरुध्द स्थगिती आदेश आणण्याकरीता विरुध्द पक्षास संधी देण्यात आली

पाहीजे. परंतु सदरचा आदेश हा गुणदोषावर पारित करण्यात आल्यामुळे त्यास स्थगिती देता येणार नाही. सबब खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी नं.१ चा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.१ यांना नि.१६ विरुध्द स्थगिती आदेश आणण्याकरीता पुढील पंधरा दिवसांची मुदत देण्यात येते.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.08.11 16:12:21 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– ११/०८/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी..

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.A.Jamadar (L.G.) |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn., Atpadi. |
| Date. | : | 11.08.2023. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 11.08.2023. |
| Judgment uploaded on. | : | 11.08.2023. |